# गाव जनसंवादात चर्चा झालेले मुद्दे, निर्णय आणि पाठपुराव्याचे मुद्दे..!



**विविध मागण्यांसाठी अस्तित्व सामाजिक संस्थेच्या वतीने निवेदन सादर**

सांगोला/प्रतिनिधी:

## लोणविरे –

०२ जुलै २०१९ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र जवळामधील लोणविरे येथे सोशल ऑडिट जनसंवाद घेण्यात आला. या जनसंवादाला गावातील महिला व पुरुष उपस्थित होते. जननी सुरक्षा योजना व प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना व अंगणवाड्यांमधील योजनांविषयी माहिती देण्यात आली. तसेच या योजनेच्या लाभापासून वंचित असलेले व लाभ मिळालेले लाभार्थी उपस्थित होते. जनसंवादात पुढील मुद्दे गाव पातळीवर उपस्थित केले गेले.

१. आशाताई याच्या गृह भेटी कमी प्रमाणात आहेत.

२. आरोग्य सेवकाच्या व आरोग्य सेविकेच्या पण गृह भेटी कमी प्रमाणात आहेत.

३. अंगणवाड्यांमधील थोड्याफार प्रमाणामध्ये असलेल्या त्रुटी गाव गटाकडून मांडण्यात आल्या.

या सर्व मुद्यांवर गाव गट, सरपंच, ग्रामसेवक यांच्या समोर गावपातळीवर आरोग्यसेवा देणारे कर्मचारी यांनी मान्य केले की, आमच्या गृह भेटी कमी असल्या कारणाने लाभार्थी वंचित राहिले आहेत. यासाठी पुढील महिन्याभरामध्ये सर्व लाभार्थी यांचा पाठपुरावा करून लाभ मिळवून देऊ. तसेच गावातील दोन्हीही अंगणड्यांमधील अडचणी पुढील पंधरा दिवसात दूर करण्याचे ठरले. आणि गट सदस्य व सरपंच व ग्रामसेवक यांच्याकडून एक महिन्यानंतर आढावा घेण्याचे ठरले.

> **गौडवाडी येथील जनसंवादामुळे गावात अगोदर दोनच आशा कार्यकर्त्या होत्या. त्यामुळे काही लाभापासून वंचित राहत होते. जनसंवादानंतर एक आशा कार्यकर्ती घेण्यात आली आणि आठ दिवसात काही लाभार्थ्यांचे पैसे जमा झाले.**

## आलेगाव-

५ जुलै २०१९ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र घेरडी अंतर्गत आलेगाव येथे उपकेंद्रामध्ये सोशल ऑडिट जनसंवाद घेण्यात आला. या जनसंवाद कार्यक्रमाला सरपंच, ग्रामसेवक, आशा सुपरवायझर, अंगणवाडी सुपरवायझर, अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत सदस्य व गट सदस्य व लाभार्थी उपस्थित होते. जनसंवादात जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना आणि अंगणवाडीमधील सेवांचा अभ्यास मांडण्यात आला. यामध्ये तिनही योजनेपासून लाभार्थी वंचित राहिलेले आढळून आले आहे असे सर्वांसमोर मांडण्यात आले. सविस्तर चर्चा झाल्यानंतर गावाची लोकसंख्या मोठी असल्याकारणाने वाडीवस्तीवर पोहचता आले नाही. असे ANM व अंगणवाडी सेविका यांनी सांगितले. यावर सरपंच ग्रामसेवक यांनी पंधरा ते वीस दिवसामध्ये वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांसाठी ग्रामपंचायतची मदत घेऊन लाभ मिळवून देण्याचे ठरले. गट आलेगाव सदस्य व लाभार्थी यांची पुढील महिन्यामध्ये आढावा बैठक घेण्याचे ठरले.

